महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - 400 051.

कामगार विभाग/ब/ककनिस/ २२९४ दिनांक ११/०१/१९९६

परिपत्रक

विषय :- कर्मचारी कल्याण निधी समिती ...
वेतनगट १ व २ मधील अधिका-यांच्या पाल्यांना
शिष्यवृत्ती मंजूर करणे बाबत.

कर्मचारी कल्याण निधी मधून वेतनगट तीन व चार मधील कर्मचा-यांच्या माध्यमिक शालांत परिक्षेत उत्तीर्ण होऊन गुणवत्ताधारक पाल्यांना रोख पारितोषिक व रु. ७५.०० प्रतिमाह शिष्यवृत्ती मंजूर केली जाते त्या धर्तीवर दि. १३.९.९५ रोजी झालेल्या कर्मचारी कल्याण निधी समितीच्या २७ व्या बैठकीत वेतनगट १ व २ मधील अधिका-यांच्या रोख पारितोषिक प्राप्त केलेल्या पाल्यांना रु. ७५.०० प्रतिमाह शिष्यवृत्ती देण्याबाबतच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला असून वेतन गट १ व २ मधील शैक्षणिक सत्र १९९३-९४ वर्षात म्हणजे मार्च १९९४ च्या माध्यमिक शालांत परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या अधिका-यांच्या पाल्यांनाही रु. ७५/- प्रतिमाह शिष्यवृत्ती देण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

अ) त्यानुसार या कार्यालयाचे परिपत्रक क्र. कामगार-ब-ककनिस-१५७७ दि. ११.१.९५ व परिपत्रक क्रमांक कामगार ब-४-ककनिस-४२७५ दि. २१.१.९५ (मुख्य कार्यालयासाठी) व परिपत्रक क्रमांक कामगार-ब-४-ककनिस-९०१२ दि. ६.३.९५ (क्षेत्रीय परिमंडळालासाठी) अन्वये निर्गमित केलेल्या परिपत्रकात नमूद केलेल्या वेतनगट १ व २ मधील अधिका-यांच्या पाल्यांना प्रतिमाह रु. ७५.०० या दराने शिष्यवृत्ती देण्यात यावी.

ब) सन १९९४-९५ व १९९५-९६ या सत्रासाठी वरील शिष्यवृत्ती पुढे चालू ठेवण्यासाठी या कार्यालयाच्या परिपत्रक क्र. कामगार-ब-ककनिस-२६२३२, दि. २९.६.९५ मधील सर्व अटींची पूर्तता करुन घेण्यात यावी.

क) कर्मचारी कल्याण निधी समिती मधून देण्यात येणारी शिष्यवृत्ती यापुढे कर्मचारी/अधिका-यांचा पाल्य पदवी किंवा पदविका प्राप्त करेपर्यंतच चालू ठेवण्यात येईल.

या परिपत्रकास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

या कार्यालयाचे परिपत्रक क्र. कामगार-ब-ककनिस-२६२३२ दि. २९.६.९५ मधील इतर शर्ती-अटी अबाधित राहतील.

(सही)

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी तथा
सचिव, कर्मचारी कल्याण निधी समिती.

प्रहवै

• दुरध्वनी : 642 22 11, 642 21 31 • टेलेक्स : 011-78293/94 • फॅक्स : (022) 6443749 • तार : M

प्रत सादर:-

१) मुख्य कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख.

२) कार्यकारी अभियंता पर्यंतचे सर्व क्षेत्रीय अधिकारी.

३) सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी , नागपूर.

४) सर्व उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी / औद्योगिक संबंध अधिकारी/ कल्याण अधिकारी/ कामगार अधिकारी.

माटे
३-१-९६